
Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA



Volume-VII, Issue-III
July - September - 2018
English Part - IV
Marathi - III / Hindi - III

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

VOLUME - VII, ISSUE - III - JULY - SEPTEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - III



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | १९४२ चे भारत छोडो आंदोलनात मुस्लिमांचा सहभाग<br>**डॉ. शेख हूसैन इमाम** | १-३ |
| २ | महाराष्ट्र राज्याची शेती विकासाकडे वाटचाल<br>**प्रा. डॉ. बी. एस. भालेराव** | ४-८ |
| ३ | सुरक्षा परिषद: लोकशाहीकरण आणि भारताची दावेदारी<br>**प्रा. एकनाथ ज्ञानदेव खरात** | ९-१४ |
| ४ | १८५७ चा दक्षिण महाराष्ट्र एक दृष्टिक्षेप<br>**प्रा. डॉ. वसंत श्रावण देसले** | १५-२१ |
| ५ | मराठे कालीन व्यापार व उद्योगधंदे<br>**प्रा. डॉ. मिलिंद दशरथराव तायडे** | २२-२४ |
| ६ | डी. एस. आर. अध्यापक महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमत्तेचा अभ्यास<br>**प्रा. डॉ. शेख रुकसाना अजीज**<br>**डॉ. कानिज फातेमा** | २५-२८ |
| ७ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वृत्तपत्रीय लेखनातील धर्मांतरविषयक विचार<br>**प्रा. महेंद्र यादवराव घनसावंत**<br>**प्रा. डॉ. प्रकाश वाघमारे** | २९-३२ |
| ८ | छत्रपती शिवाजी महाराज आणि परकीय सागरी सत्ता एक अवलोकन<br>**प्रा. डॉ. दत्ता पिलाप्पा हिंगमिरे** | ३३-३७ |
| ९ | बंधू माधव यांच्या कथेवर पडलेला आंबेडकरी विचारांचा प्रभाव<br>**प्रा. डॉ. बालाजी खराबे** | ३८-४३ |
| १० | सैनिकी शाळा व्यवस्थापनात येणाऱ्या समस्या व उपाय<br>**दत्तात्रय महादु पडघान** | ४४-४६ |
| ११ | सम्राट अशोकाचा बौध्द धर्म<br>**प्रा. डॉ. राजाराम सोनवणे** | ४७-४९ |
| १२ | भारतीय असंघटित क्षेत्रातील यंत्रमाग उद्योगाची वाढ आणि विकास<br>**डॉ. जाधव लीली दोधा** | ५०-५२ |
| १३ | वेळापूरच्या इतिहासाचे साक्षीदार<br>**श्री शिवाजी हरी चौगुले**<br>**डॉ. विश्वास शामराव कंधारे** | ५३-५८ |

VOLUME - VII, ISSUE - III - JULY - SEPTEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR -5.5 (www.sjifactor.com)

# १. १९४२ चे भारत छोडो आंदोलनात मुस्लिमांचा सहभाग

**डॉ. शेख हूसैन इमाम**
इतिहास विभाग, मिल्लिया कला विज्ञान व व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालय, बीड.

**प्रस्तावना**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा विचार करतांना तीन वेगवेगळया प्रवृत्ती दिसून येतात. एक म्हणजे सामाजिक सुधारणेची चळवळ, दूसरे राजकिय चळवळ आणि तिसरी राष्ट्रवादी लोकांची प्रक्षोभक चळवळ. सामाजिक सुधारणेच्या बाजूने असलेले चळवळीमध्ये सहभागी नाहीत असा अंदाज काढला जातो. काही वेळा त्यांच्यावर इंग्रज धार्जिणेपणाचा आरोप लावला जातो. याचे कारण म्हणजे सनातन व परंपरावादी लोकांच्या विरोधी ही चळवळ गेली व त्यांच्याच हातात जनसंवाद माध्यमे व साहीत्य चळवळ आहे.

भारतात हिंदू बहूसंख्य असल्याने स्वाभाविकच स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झालेल्यामध्ये हिंदूचे प्रमाणही फार मोठे आहे. याचा अर्थ भारताच्या स्वतंत्र्यासाठी इंग्रजाविरूध्द हिंदू लढत असतांना मुसलमान, पारशी, शीख वगैरे अन्य धर्माचे लोक निव्वळ मौज पाहात होते हे म्हणणे अंत्यत चुकीचे होईल. इ.स.१९३७ ते इ.स.१९४७ या दशकात मुस्लिम लीग सारख्या राजकिय पक्षाने केलेल्या पाकिस्तान निर्मितीच्या मागणीमुळे देशाची फाळणी झाली. या वस्तुस्थितीकडे लक्ष वेधणा-यानीही १८५७ ते १९३७ या ऐंशी वर्षाच्या काळात इंग्रजी राजवटीविरूध्द लढलेल्या मुसलमानाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. त्याच प्रमाणे इ.स.१९३७ ते इ.स.१९४७ या दशकात झालेल्या इ.स.१९४०-४१ च्या वैयक्तीक सत्याग्रहात किंवा इ.स.१९४२ च्या चलेजाव चळवळीत कारावास सोसणा-या तसेच आझाद हिंद फौजेत किंवा शाही नौदलातील तरूणांनी केलेल्या उठावात सहभागी झालेल्या मुसलमानाच्या योगदानाचो उपेक्षा करणे ही कृतध्नपणाचे ठरेल.

राजकिय चळवळीचा अभ्यास सामान्यतः कॉंग्रेसच्या स्थापनेपासून केला जातो. इ.स.१८५७ च्या मागे हा इतिहास नेला जातो. भारताच्या स्वातंत्र्य लढयात काही मोजक्याच मुस्लिमांचा उल्लेख केला जातो. ब्रिटिशांनी फोडा व झोडा या नीतीचा अवलंब करून मुस्लिमांना जवळ केले. महात्मा गांधीनी त्यांचे अतिशय लाड केले. अशी भूमिका मांडली जाते भारताच्या स्वातंत्र्य लढयाची सुरूवात मुस्लिमांनी केली. ब्रिटिशयेण्या आगोदर मुस्लिम समाजामध्ये आपण या देशाचे राज्यकर्ते आहोत ही भावना होती. इंग्रजांच्या नीतीमुळे याला तडे जावू लागले. तसेच धर्माला आधार राजे, जमीनदार व सरदारांचा असतो. त्यामुळे धर्मनिष्ठ लोकांना सुध्दा परक्याच्या राज्यविरूध्द चळवळीत भाग घ्यावा लागतो.

११ मार्च इ.स.१९४२ रोजी ब्रिटनचे पंतप्रधान विन्स्टन चर्चिल यांनी स्टॅफर्ड क्रिप्स हे त्याच्या मंत्री मंडळातील सहकारी भारतातील नेत्याशी वाटाघाटी करण्यासाठी जातील अशी घोषणा केली. अमेरिकेचे अध्यक्ष रूझवेल्टच्या दडपणामुळे त्याने ही घोषणा केली होती. ही बोलणी १० एप्रिल इ.स.१९४२ पर्यंत चालू होती. क्रिप्सने मांडलेल्या योजनेत

महायुध्द संपल्यानंतर घटना समिती बोलावली जाईल, भारत हे संघराज्य असेल, त्याला साम्राज्यातर्गत वसाहतीचा दर्जा असेल, कोणत्याही प्रांतास भारतीय संघराज्याची घटना मान्य नसेल त्याला वेगळी घटना निर्माण करण्याचा अधिकार देऊन त्याने एक प्रकारे फाळणी मान्य केली होती. कॉंग्रेस व गांधी जिना यांनीही क्रिप्स योजना फेटाळून लावली.

क्रिप्स योजना फेटाळल्यानंतर २९ एप्रिल ते १ मे १९४२ या तीन दिवशी अहलाबादला अखिल भारतीय कॉंग्रेस समितीची बैठक झाली. या बैठकीत कॉंग्रेस कार्यकारणीच्या क्रिप्स योजना फेटाळण्याच्या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यात आले. गांधीजी या बैठकीला हजर नव्हते पण त्यांनी केलेल्या टिपणांसहीत ठरावाचा मसुदा विचारासाठी पाठवला होता. इंग्रजांनी भारतातून आपले चंगूगबाळ उचलून निघून जावे असे गांधीजींनी सुचवले होते. गांधीनी पाठवलेला मसुदा जसाच्या तसा मुजूर झाला नाही तरी इंग्रजांनी आपण होउन भारतातून गाशा गुंडाळावा ही महात्मा गांधीची मागणी कॉंग्रेस कार्यकारणीने ६ ते १४ जुलै इ.स.१९४२ पर्यंत चर्चा करून उचलून घरली. इंग्रज भारत सोडून गेले नाही तर आपल्याला सविनय कायदेभंगाची मोहीम सुरू करण्याशिवाय कॉंग्रेसला पर्याय नाही असे ठारवात म्हटले होते.

७ व ८ ऑगस्ट इ.स. १८४२ ला मुंबईत गोवालिया अँक मैदानावर भरलेल्या अखिल भारतीय कॉंग्रेस समितीच्या बैठकित चले जावचा ठराव मंजूर करण्यात आला आणि करेंगे या मरेंगे या शब्दात इंग्रजाविरूध्द लढण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. आता चळवळी सुरू होणार याची कल्पना इंग्रजांना आल्याने त्यांनी दडपशाहीचे धोरण स्विकारले. इंग्रजांनी ९ ऑगस्टच्या पहाटे पासूनच धरपकड सुरू केली. महात्मा गांधी आणि कॉंग्रेसच्या सदस्यांना पकडण्यात आले. बॅरिस्टर आसेफअली हे तेव्हा कॉंग्रेस कार्यकारणीचे सदस्य होते. त्यांना निरोप देण्यासाठी त्यांची पत्नी श्रीमती अरूणाअसफअली स्टेशनवर आल्या होत्या. त्यांनी आपण स्वस्थ बसणार नाही आणि आपल्याला जे योग्य वाटेल ते करू असे मौलांना आझादांना सांगितले. त्या भूमिगत झाल्या व शेवट पर्यंत ते पोलिसाच्या हाती लागल्या नाही. सरकारने हजारो कॉंग्रेस कार्यकर्त्यांना तुरूगांत टाकल्यामुळे चिडलेल्या लोकांनी उग्र निदर्शने केली. सार्वजनिक हरताळ पाळले आणि मोर्चे काढले. लाठीमार गोळीबार करून सरकारने चळवळ दडपण्याचा केला. त्यामुळे जनतेने सार्वजिक पोलिस चौक्या, टपाल व तारायंत्राची कार्यालय रेल्वे स्टेशने जाळण्याचा प्रयत्न करण्यात आला.

**निर्षक**

उत्तर प्रदेशातील बलिया जिल्हा, बंगालमधील मिदनापूर जिल्हा, गुजरात अहमदाबाद आणि महाराष्ट्रात सातारा जिल्हयात भूमिगत चळवळीचा फार जोर होता. सातारा जिल्हायात कुंडल, वाळवे चरणबिळाशी, कराड,सांगली, वाई व कोरेगाव येथे भूमिगत कार्यकर्त्यांचे छोटेमोठे गअ इंग्रजांना हैराण करत होते. भूमिगत कार्यत्यांच्या कराडच्या गटामध्ये शेखकाकाच्या कामगिरीचाही आवर्जून उल्लेख केला जातो. १९४२ च्या चळवळीत नावारूपाला आलेल्या कॉंग्रेस समाजवादी पक्षाच्या निष्ठावंत कार्यकर्त्यामध्ये मोहियोद्दीन हॅरिस यांचाही समावेश होतो. १९४२ च्या चळवळीत शेकडो मुसलमानांनी प्राणर्पण केले होते. देशाच्या स्वातंत्र्यासाठी शहीद झालेल्या वीरामध्ये अहलाबादचे अब्दूल मजीद, दरभंगाचे अब्दुल रहीम, अजमगढचे हनीफ, अवापूरचे महमद इद्रिस, नागपूरचे उस्मानशेख, मोघोरचे शेख धनुक,कस्बा जिल्हा

पटणाचे इस्माईल मोहम्मद,पोखरईराजिल्हा दरंभंगाचे पीर अब्दुला,आवपूर जि.मुजफ्फरचे मुस्लिम मोहम्मद, नागपूर महाराष्ट्राचे रफिकमिया जफरमिया,अहमदपूर जि.वर्धाचे रशिदखान नवाब, इत्यादीचा समावेश होतो. मुस्लीम लीग जरी चलेजाव चळवळीपासून अलिप्त राहिली तरी सर्व मुसलमान या चळवळीपासून दूर राहिले असे समजण्याचे काहीही कारण नाही.

**संदर्भ ग्रंथ**

०१) स्वातंत्र्यलढा व भारतीय मुस्लिम, सांतिमोय रे,अनुवाद, अलिम वकिल.

०२) स्वातंत्र्य आंदोलनातील मुसलमान, डॉ.य.दी.फडके.

०३) स्वातंत्र्य सैनिक चरित्र कोश, डॉ. भ.ग.कुंट

०४) तारिखे आझादी हिंद मे मूस्लीम उलेमा और अवाम का किरदार, सूलेमान मंसूरपूरी

०५) उलेमाये हिंद का शानदार माजी खंड १,२, हजरत मौलाना सय्यद मोहम्मदमिया

०६) तहेरिरके आझादी और मुसलमान, मौलाना निजामुद्दीन इसरार अदरूई

०७) सलातिन –हिंद तारिखे मिल्लत १, जनाब मुफीत्ती जैनुल आबेदिन सज्जाद मैरठी.